# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/१०/२०२५ (सोमवार )**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक २७/१०/२०२५ रोजी नरखेड पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत मौजा सिंदी शिवार वडचिचोली ते सावरगाव रोड मसोरा फाटा दरम्यान पेट्रोलींग केली असता टिप्पर क्र एम.एच. ३६ एफ ५८०० हा रेतीची वाहतूक करतांना दिसून आल्याने पोलीसांनी सदर टिप्पर ला थांबवून तपासणी केली असता ट्रक चालकाकडे रेती वाहून नेण्याची रॉयल्टी किंवा परवाना मिळून आले नाही, करिता अवैधरित्या विना परवाना ५ ब्रास रेती (वाळु) वाहतुक करताना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातुन नमुद टिप्पर कि. २०,००,००० रू व ५ ब्रास रेती (वाळु) कि. ३०,००० रूपये असा **एकुण २०,३०,००० रू चा माल पंचासमक्ष जप्त करून वाहन चालक आरोपी नामे नामे १) चंद्रशेखर मुन्नाजी नेवारे वय ३१ वर्ष रा. फल्ली मार्केट काटोल त. काटोल तसेच वाहन मालक आरोपी नामे २) प्रणय माणकर रा. धंतोली त. काटोल** यांचे विरूध्द पोस्टे नरखेड येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या देशी, विदेशी आणि मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई (एकूण ९ आरोपीविरूध्द ९ गुन्हे नोंद. एकूण ९,४७० /— रू. चा मुद्देमाल जप्त)

**पोलीस स्टेशन वेलतूर** :— दिनांक २६/१०/२०२५ रोजी पो.स्टे. वेलतूर येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण ३ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून **मौजा खेडा माजरी** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे चंद्रशेखर भाउराव चनोडे वय ४० वर्ष रा. खेंडा ता कुही जि नागपुर** वर पंचासमक्ष धाड टाकूण **देशी दारू संत्रा** च्या प्रत्येकी १८० मिली च्या एकूण ७ निपा प्रति निप ८०/— रु प्रमाणे **एकूण ५६० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **मौजा गोठणगाव** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे उदाराम गोपाळराव शेंडे वय ५५ वर्ष रा. गोठणगाव ता कुही जि. नागपुर** वर पंचासमक्ष धाड टाकूण देशी दारू संत्रा च्या प्रत्येकी १८० मिली च्या एकूण ८ निपा प्रति निप ८०/— रु प्रमाणे **एकूण ६४० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला तसेच **मौजा पचखेडी** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलाची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे तराचंद नत्थुजी पाटील वय ५५ वर्ष रा. पचखेडी ता. कुही, जि. नागपुर** वर पंचासमक्ष धाड टाकूण २० लीटर मोहफुलाची हातभट्टीची गावठी दारू प्रति लीटर १००/— रू. प्रमाणे एकूण किं. **२०००/— ची** दारू जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. वेलतूर येथे **एकूण ३ आरोपीविरूध्द ३ गुन्हे नोंद, एकूण किं. ३२००/— चा मुद्देमाल** )

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक २६/१०/२०२५ रोजी पो.स्टे. नरखेड येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण २ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून **मौजा इंदिरा नगर बेलोणा तह. नरखेड** येथे

अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा आरोपी **नामे प्रकाश छोटुशिंग मेनडोले वय ३३ वर्ष रा. इंदिरा नगर बेलोणा तह. नरखेड जि नागपूर** वर पंचासमक्ष धाड टाकूण आरोपी जवळून एक प्लास्टिक पिसविमध्ये देशी दारूच्या १८० एम एल क्षमतेच्या ०६ निपा प्रती निप ७० रू प्रमाणे **४२०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला. तसेच तसेच **मौजा तिनखेडा** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे प्रशांत तुकाराम नागमोते वय ४४ वर्ष रा. .दिंदरगांव तह. नरखेड जि नागपूर** वर पंचासमक्ष धाड टाकूण देशी दारू संत्रा च्या प्रत्येकी १८० एम एल क्षमतेच्या ०९ निपा प्रती निप ७० रू प्रमाणे **एकुण ६३०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. नरखेड येथे **एकूण २ आरोपीविरूध्द २ गुन्हे नोंद, एकूण किं. १०५०/— चा मुद्देमाल** )

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २६/१०/२०२५ रोजी पो.स्टे. सावनेर येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण २ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून **मौजा चाफा सावनेर** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा आरोपी **नामे दिलीप तेजराव कोहळे वय ४८ वर्ष रा वार्ड क्र ३ चांफा ता दृ सावनेर** वर पंचासमक्ष धाड टाकूण आरोपी जवळून एक प्लास्टिक पिसविमध्ये देशी दारू भिंगरी संत्रा च्या १८० एम एल क्षमतेच्या २४ निपा प्रती निप ८० रू प्रमाणे **१९२०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला. तसेच तसेच **मौजा बाजार चौक पाटणसावंगी** येथे अवैधरित्या मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे** अभिषेक मारोती मोहोड रा. बाजार चौक, पाटणसावंगी वर पंचासमक्ष धाड टाकूण हातभट्टीची मोहफुलांची ५ लीटर गावठी दारू किं. **५००/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. सावनेर येथे **एकूण २ आरोपीविरूध्द २ गुन्हे नोंद, एकूण किं. २४२०/— चा मुद्देमाल** )

पोलीस स्टेशन काटोल:— दिनांक २६/१०/२०२५ रोजी **पो.स्टे. काटोल** येथील पोलीस स्टॉफ ने **मौजा** पारधी बेडा धरतवाडा येथे अवैधरित्या देशी व हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारी महिला आरोपी वर छापा टाकून कारवाई केली असता आरोपी कडून ४० लिटर मोहफुलांची गावठी दारू किं. २०००/— रू. तसेच १८० एम.एल. क्षमतेच्या ०५ निपा देशी दारू किं. ४००/— रू. असा एकूण **किंमती २४००/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

पोलीस स्टेशन बेला :— दिनांक २६/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन बेला येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. बेला हद्दीतील मौजा **झमकोली** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे **गजानन दयाराम श्रीरामे वय ४० रा. झामकोली ता. भिवापूर जि. नागपूर** याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या ०५ निपा देशी दारू भिंगरी संत्रा किं. **४००/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**(अशाप्रकारे एकूण ०९ आरोपीविरूध्द ०९ गुन्हे नोंद व एकूण ९,४७० /— रू. चा मुद्देमाल जप्त)**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २७/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मंडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांनी पीपरी घाट या ठिकाणी परिसरातील लोकांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,

१. ऑनलाईन फ्री गिफ्ट किंवा कुपन्स साठी येणाऱ्या लिंक वर पडताळणी करूनच क्लिक नका. तुमचा मोबाईल हॅक होवुन डेटा चोरी होवु शकतो. संशयीत मोबाईल क्रमांक, इमेल, मेसेज आणि लिंक्स बाबत **www.cybercrime.gov.in** या संकतेस्थळावर रिपोर्ट करा. तसेच सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी **www.cybercrime.gov.in** या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक **1930 , 1945** यावर तक्रार नोंदवा.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने